नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - १८९ | Issue - 189 | वार मंगळवार दि. २६ नोव्हेंबर २०२४ | Blow- Tuesday Date 26 November 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात

### भारताचा ऑस्ट्रेलियावर ऐतिहासिक विजय

नवी दिल्ली : भारतीय संघाने बॉर्डर गावस्कर ट्रॉफीतील पहिल्याच कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियाचा दारूण पराभव केला आहे. पर्थच्या अभेद्य बालेकिल्ल्यात भारताने ऑस्ट्रेलियावर २९५ धावांनी मोठा ऐतिहासिक विजय मिळवला आहे. यशस्वी जैस्वालच्या १६१ धावा आणि विराट कोहलीच्या शतकाच्या जोरावर भारताने ऑस्ट्रेलियाला विजयसाठी ५३३ धावांचे लक्ष्य देत डाव घोषित केला होता. पहिल्या डावात १५० धावांवर सर्वबाद झाल्यानंतर भारताच्या गोलंदाजांनी ऐतिहासिक पुनरागमनात मोठी भूमिका बजावली. भारतीय संघाने बॉर्डर गावस्कर ट्रॉफीची ऐतिहासिक विजयाने सुरूवात केली आहे. जसप्रीत बुमराह, यशस्वी जैस्वाल भारताच्या विजयाचे शिल्पकार ठरले. भारतीय संघ ऑस्ट्रेलियाच्या बालेकिल्ल्यात म्हणजेच पर्थच्या स्टेडिमयवर ऑस्ट्रेलियाला पराभूत करणारा पहिला संघ ठरला आहे.

पहिल्या डावात (पान २ वर...)

# महायुतीचं अखेर ठरलं! देवेंद्र फडणवीसच होणार मुख्यमंत्री



## एकनाथ शिंदे, अजित पवारांना उपमुख्यमंत्रीपद; महायुती सुसाट; महाविकास आघाडीचा धुव्वा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा धुव्वा उडवत महायुतीने जोरदार मुसंडी मारली आहे. आता निवडणुकीच्या निकालानंतर सत्तास्थापनेसाठी हालचाली सुरू झाल्या आहेत. अशात महायुतीमधून भाजपाचे देवेंद्र फडणवीस यांची मुख्यमंत्रीपदी वर्णी लागणार असल्याची माहिती समोर आली आहे.

भाजपाच्या केंद्रीय नेतृत्त्वाने मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांच्या नावाला मंजूरी दिली असून, शिवसेना आणि राष्ट्रवादीनेही या निर्णयला होकार दिला आहे. भाजपामधल्या दोन उच्चपदस्थ नेत्यांनी दिलेल्या माहितीनुसार एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे नव्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्री असणार आहेत.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी संध्याकाळी दिल्लीत शिंदे, फडणवीस आणि पवार यांच्यासमवेत सत्तावाटपाचा तपशील आणि मंत्रिमंडळ रचना यावर चर्चा करण्यासाठी बैठक बोलावली असून त्यानंतर घोषणा अपेक्षित आहे.

राज्यात २० नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणुकीसाठी मतदान झाले. त्यानंतर २३ नोव्हेंबर रोजी जाहीर झालेल्या निकालात महायुतीने बाजी मारत २३० जागांवर विजय मिळवला. यामध्ये भारतीय जनता पार्टीने सर्वाधिक १३२ जागा जिंकल्या. तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने ५७ जागांवर बाजी मारली. महायुतीतून सर्वात कमी जागा लढवणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसनेही ४१ जागांवर विजय मिळवला.

### महाविकास आघाडीचा धुव्वा

दुसरीकडे सर्वत्र महाविकास आघाडीची सत्ता येणार अशी चर्चा असताना त्यांचा सुपडा साफ झाला. या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या वाट्याला अवघ्या ४७ जागा आल्या. यामध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने २०, काँग्रेसने १९, राष्ट्रवादीकाँग्रेसपक्ष शरदचंद्र पवार पक्षाने १०, समाजवादी पक्षाने २ व शेतकरी कामगार पक्ष आणि भारतीय कम्युनिस्ट पक्ष (एम) ने प्रत्येकी एका जागेवर विजय मिळवला.

### कोणत्या पक्षाचे किती मंत्री?

**शिवसेनेला सुमारे १२ मंत्रीपदे मिळण्याची शक्यता असून, यामध्ये काही महत्त्वाच्या खात्यांचाही समावेश आहे. दुसरीकडे राष्ट्रवादीलाही जवळपास १० मंत्रिपदे मिळणार आहेत. १३२ आमदार असलेल्या भाजपाच्या वाट्याला २१ मंत्रीपदे येण्याची शक्यता आहे. गृह, अर्थ, नागरी विकास आणि महसूल ही प्रमुख चार खाती भाजपा आपल्याकडे ठेवण्यास उत्सुक आहे. भाजपा गृह आणि अर्थ खात्यासाठी आग्रह धरू शकते, असे भाजपच्या अंतर्गत सूत्रांचे म्हणणे आहे.**

# संविधानाची प्रस्तावना बदलता येते; कोर्टाने थेट संसदेच्या अधिकारावर भाष्य केले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: सर्वोच्च न्यायालयाने राज्यघटनेच्या प्रस्तावनेतील समाजवादी आणि धर्मनिरपेक्ष सारख्या शब्दांचा समावेश करणाऱ्या १९७६च्या संविधान दुरुस्तीला आव्हान देणाऱ्या याचिका सोमवारी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावल्या. या सुनावणी दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने हे देखील म्हटले की, संविधान दुरुस्तीचा अधिकार संसदेकडे आहे आणि संविधानातील दुरुस्तीचा संसदेचा अधिकार हा प्रस्तावनेला देखील लागू होतो. याचा अर्थ सर्वोच्च न्यायालयाने हे मान्य केले आहे की संविधानाच्या प्रस्तावनेत बदल केला जाऊ शकतो. देशात दिर्घकाळापासून या मुद्द्यावर चर्चा सुरू आहे. अनेकांच्या मते संविधानाच्या मुळ पायाला धक्का लावता येणार नाही, त्यावर आज सर्वोच्च न्यायालयाने उत्तर दिले आहे.



सर्वोच्च न्यायालयाने संविधानाच्या प्रस्तावनेत असलेल्या समाजवादी आणि धर्मनिरपेक्ष शब्दांना आव्हान देणाऱ्या याचिका फेटाळून लावल्या. या सुनावणीनंतर एक मोठा वाद संपुष्टात आला आहे. जेव्हा जेव्हा संविधानाच्या प्रस्तावनेतील बदलाची चर्चा होते. तेव्हा काही राजकीय नेते आणि देशातील एक मोठा वर्ग असे म्हणतो की- संविधानाची प्रस्तावना हा मुळ पाया असून त्यात बदल केला जाऊ शकत नाही. यावर अनेक वर्षापासून चर्चा सुरू आहे. सर्वोच्च न्यायालयाने आज हे स्पष्ट केले की- प्रस्तावनेत बदल करण्याचा अधिकार संसदेला आहे. आणि घटना दुरुस्तीच्या वैधतेवर आता प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाऊ शकत नाहीत.

### सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय

आज झालेल्या सुनावणीत संसदेला संविधानात दुरुस्ती करण्याचा जो अधिकार मिळाला आहे, तो प्रस्तावनेला देखील लागू होतो असे कोर्टाने स्पष्ट केले. प्रस्तावना ही संविधानाचा एक भाग आहे त्याला वेगळे मानता येणार नाही. सरन्यायाधिशांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने हा देखील प्रश्न उपस्थित केला की- इतक्या वर्षानंतर हा मुद्दा उपस्थित करण्याचे कारण काय. इतक्या वर्षानंतर संविधानातील दुरुस्ती प्रक्रिया अमान्य करता येणार नाही.

संविधानातील कलम ३६८ अंतर्गत सरकारचे अधिकार कमी करणार नाही तसेच त्याला कोणी आव्हान देऊ शकत नाही. संसदेचे घटना दुरुस्तीचा अधिकार प्रस्तावनेला लागू होतो. इतकी वर्ष झाला आता हा मुद्दा का उपस्थित केला जातोय असा सवाल न्यायालयाने केला. त्याच बरोबर संविधानातील ४२व्या दुरुस्तीवर न्यायालयाकडून केल्या जाणाऱ्या वारंवार समीक्षेवर कोर्टाने भाष्य केले- आणिबाणीच्या काळात संसदेने जे काही केले ते सर्व निरर्थक होते.

# थंडीचा जोर आणखी वाढणार?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : थंडीचा जोर वाढत असल्याने शहर आणि परिसरात सध्या सुखद गारवा अनुभवायला मिळत आहे. रात्री आणि दिवसाही वातावरण थंड असून, यंदाच्या हंगामातील सर्वांत कमी १०.५ अंश सेल्सियस तापमान एनडीए येथे नोंदवले गेले. येत्या काही दिवसांत थंडीचा जोर आणखी वाढून पारा घसरण्याचा अंदाज आहे.



हवेतील आर्द्रता कमी होऊन वातावरण कोरडे होत आहे. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून शहरातील तापमानात सातत्याने घट होत आहे. मात्र, बंगालच्या उपसागरात कमी दाबाच्या क्षेत्राची निर्मिती झाली आहे. हे क्षेत्र आंध्र प्रदेश किनारपट्टीच्या जवळून उत्तरेकडे वाटचाल करण्याचा अंदाज आहे. त्यामुळे मध्य भारतासह महाराष्ट्रात आर्द्रता वाढू शकते. तसेच नोव्हेंबरअखेर आणि डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांमध्ये वाढ होऊन रात्रीच्या तापमानात घट होऊ शकते. त्यामुळे येत्या काही दिवसांत हंगामातील एक आकडी किमान तापमान नोंदवले जाऊ शकते, अशी माहिती ज्येष्ठ हवामानशास्त्रज्ञ अनुपम कश्यपी यांनी दिली.

हवामान विभागाच्या आकडेवारीनुसार सोमवारी एनडीए येथे सर्वांत कमी १०.५ अंश सेल्सियस तापमान नोंदवले गेले. तर तळेगाव येथे १९.०, हवेली आणि शिरूर येथे ११, आंबेगाव येथे ११.५, शिवाजीनगर येथे १२.१ अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. तर रविवारी हवेली येथे ११.५ अंश सेल्सियस, तळेगाव येथे १२.२, एनडीए येथे १२.३, शिवाजीनगर येथे १३.४ तापमान होते.

शहरातील गारवा वाढत असल्याने वातावरण आल्हाददायक झाले आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळी ठिकठिकाणी शेकोट्या पेटू लागल्याचे आहेत. तसेच दिवसाही थंड वारे, गारव्यामुळे स्वेटर घातले जाऊ लागले आहेत.

## ईडीची राजधानी दिल्लीत मोठी कारवाई

# ५०० कोटी रुपयांच्या कथित घोटाळ्याप्रकरणी मारले छापे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: सुमारे ५०० कोटी रुपयांच्या कथित घोटाळ्याप्रकरणी सक्तवसुली संचालनालयाने दिल्ली-राष्ट्रीय राजधानी क्षेत्रात (एनसीआर) बांधकाम कंपन्यांशी संबंधित सुमारे डझनभर ठिकाणी सोमवारी छापे मारले. अधिकृत सूत्रांनी ही माहिती दिली.

ओरिस इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., ग्रीनबे इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. आणि थी सी शेल्टर प्रा. लि. या कंपन्या तसेच त्यांचे प्रवर्तक विजय गुप्ता, अमित गुप्ता, सरदार निर्मल सिंग आणि अन्य काही संचालक यांच्यावर हे छापे मारण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. ईडीच्या गुरुग्राम विभागीय कार्यालयाने ही छापेमारी केली.

दिल्ली पोलिसांची आर्थिक गुन्हे शाखा आणि गुरुग्राम पोलिस यांच्याकडे दाखल करण्यात आलेल्या एफआयआरप्रकरणी ईडीकडून भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या तरतुदींअंतर्गत तपास सुरू आहे. या कंपन्यांच्या गृहप्रकल्पांमध्ये गुंतवणूक केलेल्या खरेदीदारांनी याप्रकरणी तक्रारी केल्या होत्या. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या बांधकाम कंपन्यांचे प्रवर्तक, भागधारक आणि संचालक यांच्या लाभासाठी घोटाळा, गैरव्यवहार आणि ५०० कोटी रुपयांहून अधिक रकमेचे हस्तांतरण केल्याच्या आरोपांप्रकरणी ईडी तपास करत आहे. या बांधकाम कंपन्यांनी एक हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम गोळा केली, परंतु केवळ ५०० कोटी रुपये प्रत्यक्ष प्रकल्पांवर खर्च केले. एवढेच नव्हे, तर परवाना असलेल्या जमिनीची घोटाळा करून विक्री करणे आणि पुढील गुंतवणुकीसाठीचा निधी अन्यत्र वळवणे या कारणांमुळे या प्रकल्पांचे काम थांबले, असा आरोप आहे.

### बेटिंगप्रकरणी आणखी २१९ कोटी गोठवले

लोकसभा निवडणुकीच्या निकालासंबंधी सट्टेबाजी तसेच आयपीएल क्रिकेट सामन्यांचे बेकायदा प्रसारण यामध्ये सहभागी असलेल्या 'फेअरप्ले' या वेबसाइटविरोधातील भ्रष्टाचार प्रकरणी, सक्तवसुली संचालनालयाने आणि २१९ कोटी रुपयांची मालमत्ता गोठवली आहे. ईडीने प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनानुसार, 'फेअरप्ले' नावाच्या वेबसाइटविरोधातील या प्रकरणात मागील आठवड्यात मुंबई-ठाण्यासह अजमेर (राजस्थान), कच्छ (गुजरात), दमण येथील भूखंड, सदनिका, गोदामे तसेच डिमॅट खाती आदी मालमत्ता गोठवण्याचे हंगामी आदेश भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये देण्यात आले होते.

या प्रकरणी ईडीने आधी १०० कोटींच्या मालमत्ता गोठवल्या होत्या. गोठवलेल्या एकूण मालमत्तांचे मूल्य ३३१ कोटींवर गेले आहे. मुंबई पोलिसांच्या सायबर कक्षात याबाबत तक्रार दाखल करण्यात आली होती. क्रिश लक्ष्मीकांत शहा हा प्रामुख्याने दुबईहून फेअरप्ले वेबसाइटचा कारभार चालवत होता.

## जनतेपर्यंत अनेक योजना पोहोचवल्या, त्यामुळेच हे यश मिळाले

### अजित पवार यांचा विरोधकांना सवाल

# लोकसभा, छत्तीसगड निवडणुकीत मतयंत्रात घोटाळा झाला नाही का?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कराड : 'महायुती'ला बहुमत मिळाले म्हणून विरोधकांनी मतयंत्रावर (ईव्हीएम) खापर पडू नये. छत्तीसगडमध्ये यांचे सरकार निवडून आल्यावर आणि लोकसभेला आमच्या झालेल्या पराभवावेळी मतयंत्रात घोटाळा झाला नाही का? असा सवाल करून, लोकसभेच्या पराभवातून धडा घेत आम्ही काम केले. जनतेपर्यंत अनेक योजना पोहोचवल्या. त्यामुळे हे यश मिळाल्याचा दावा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केला.



माजी उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिदिनानिमित्त कराडमध्ये आले असता पत्रकारांशी ते बोलत होते. आमदार मकरंद पाटील, हसन मुश्रीफ उपस्थित होते. अजित पवार म्हणाले, महाराष्ट्राच्या कृषी, औद्योगिक प्रगतीचा पाया रचणाऱ्या यशवंतराव चव्हाणांना महाराष्ट्र कदापि विसरणार नाही. शिव, शाहू, फुले, आंबेडकरांची विचारधारा आणि चव्हाणसाहेबांनी घालून दिलेल्या वाटेने आम्ही व सर्वांनी वाटचाल करणे हीच यशवंतरावांना खरी श्रध्दांजली ठरेल.

मुख्यमंत्रिपदासाठी तुमचेही नाव चर्चेत असल्याचे विचारले असता, अजित पवार म्हणाले, 'महायुती'चे मुख्यमंत्रीपदासंदर्भात कोणतेच सूत्र (फॉर्म्युला) अजून तरी ठरलेले नाही. त्यासंदर्भात आम्ही एकत्र बसून निर्णय घेऊ. राष्ट्रवादी काँग्रेसने माझी नेतेपदी तर, एकनाथ शिंदे यांची शिवसेनेच्या नेतेपदी निवड झाली आहे. भाजप त्यांच्या नेतेपदाची निवड करतील. आम्ही तिघेही पक्षनेते एकत्र बसू, आमच्या सहकाऱ्यांशी चर्चा करू. राज्याला मजबूत, स्थिर सरकार देऊ असा विश्वास अजित पवार यांनी दिला. राज्याच्या तिजोरीचा विचार करून आम्ही योजना जाहीर केल्या व त्याचा लाभही दिल्याचे त्यांनी ठळकपणे नमूद केले.

बारामतीतील लढतीबाबत ते म्हणाले, युगेंद्र हा व्यावसायिक असून, त्याचा राजकारणाशी काहीही संबंध नाही. लोकसभेला माझी चूक झाली, हे मी सर्वांना सांगून दमलो. तरीही माझ्या सख्ख्या पुतण्याला माझ्या विरोधात उभे करायचे काहीच कारण नव्हते, माझी चूक झाली, म्हणजे घरातलाच माणूस उभा करायचा काय? असा सवाल त्यांनी शरद पवारांना निक्षून केला.

राज्यात राष्ट्रपती राजवट लागू होण्याची स्थिती नाही. आजच घटक पक्षांचे तिघे आम्ही एकत्र बसून स्थिर सरकार देऊ, आमच्याकडे बहुमत आहे, विरोधी पक्ष नेता होण्यासाठी लागणारे संख्याबळ विरोधकांकडे नाही. मात्र, विरोधकांचा मानसन्मान ठेवण्याची पद्धत आम्ही कायम ठेवू, त्यांचे रास्त प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करू, सगळ्यांना विश्वासात घेऊन आम्ही काम करणार आहोत. राज्य सर्व क्षेत्रावर आघाडीवर कसे राहील, ही परंपरा कायम ठेवण्यासाठी कमी पडणार नसल्याची ग्वाही अजित पवार यांनी दिली.

# संविधान समजून घेतांना

संविधान लागु झाले आणि देशात शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक व राजकीय क्रांती झाली. हजारो वर्षांपासून विषमतावादी व्यवस्थेने विषमता बळकट करून माणसाला माणसापासून दूर करुन सर्व प्रकारचे हक्क अधिकार व विकासाच्या माध्यमापासुन दुर ठेवले होते. संविधानामुळे झोपडीतील लोक, गावकुसाबाहेरचे लोक शाळा, नोकरी, संसदेमध्ये जाऊ लागले व समाजात स्वाभिमानाचे मिरवू लागले. संविधानाने समता, बंधुता, न्याय व वैयक्तिक स्वातंत्र्य देऊन माणसाला जगण्याचे बळ दिले. संविधानामुळे आज सर्वांना प्रवर्गातील लोक शिक्षण घेत आहेत, नोकरी करत आहेत, राजकारणात जात आहेत, संविधाने दिलेल्या हक्क अधिकाराचा फायदा घेत आहेत. तरीही आज खुप मोठी शोकांतिका आहे ती म्हणजे संविधान समजून घेण्याची. स्वतःला उच्च विद्याभुषीत समजणारे, स्वतःला जागृत व सक्षम समजणाऱ्या लोकांमध्येच आजही संविधानाबद्दल जागृती नाही ही देशासाठी खुप घातक बाब आहे. सुशिक्षित असणाऱ्या लोकांना आजही संविधानाचे गांभीर्य नाही. मोठमोठ्या खुर्चीत बसुन हक्क अधिकार आणि कायद्याच्या बाता करणाऱ्या लोकांना जर संविधानाची माहिती नसेल तर तेव्हा त्यांच्या बुद्धीची किव येते. आजही सुशिक्षित व माहिती तंत्रज्ञानाच्या युगात भारतीय संविधान घराघरात पोहचले नसेल आणि स्वतःला सुशिक्षित समजणारे व संविधानाचे लाभार्थी संविधानाला एकाच जातीची खाजगी संपत्ती समजत असतील तर ते खुप अज्ञानी व देशद्रोही आहेत. कारण संविधान हे देशाचे असते हे ज्याला कळत नाही त्याला सुशिक्षित कसं म्हणायचं? आणि संविधाना बद्दल प्रेम, आपुलकी नाही आणि जागृती नाही त्याला देशप्रेमी किंवा राष्ट्रप्रेमी कसं म्हणायचे हा प्रश्न खुप गंभीर आहे. आज प्रत्येक महिलेचे जन्मापासून तर मरेपर्यंत जे काही हक्क अधिकार आणि मान सन्मान बहाल झालेला आहे तो केवळ संविधानामुळेच. स्त्रीयांना स्त्रि पुरुष समानता, शिक्षण, नोकरी मध्ये बरोबरीचे स्थान हे केवळ संविधानाची देण आहे. घराचा उंबरठा ओलांडण्याचा अधिकार नसलेल्या स्त्रियांना संसदेचे व अधिकारी होण्याचे द्वार केवळ भारतीय संविधानाचे उघडून महिलांना माणूस बनवले. पुरुषां एवढाच पगार, हक्क अधिकार संविधानाने स्त्रीयांना बहाल केले आहेत. आई- वडिलांच्या संपतीमधील व नवऱ्याच्या संपतीमधील हिस्सा भारतीय संविधानाने मिळवून दिला आहे. ओबीसी, एस सी, एस टी च्या सर्वांगीण विकासाचे एकमेव माध्यम म्हणजे भारताचे संविधान होय. याची किती लोकांना जाणीव आहे? हा चिंतेचा विषय आहे. ओबीसी, एस सी, एस टीचे शिक्षण, नोकरी, राजकारण व सामाजिक विकास हा केवळ भारतीय संविधानामुळे झालेला आहे. ज्याद्वारे आपल्या सर्वांगीण विकास होतो त्याबद्दल च जर आपण जागृत नसेल तर आपण पुन्हा गुलामगिरी कडे वाटचाल करत असतो हे ही सत्य आहे. म्हणून संविधान समजून घेतांना आपल्याला अगोदर आपला इतिहास समजून घ्यावा लागेल. ओबीसी, एस सी, एसटी च्या लोकांना संविधान लागु होण्यापूर्वी कोणत्याही प्रकारचे हक्क अधिकार नव्हते, शिक्षण, नोकरी मध्ये स्थान नव्हते. आजही आपण बघितले तर आजच्या लोकांचे आजोबा, पंजोबा अडाणी होते, ते कोणत्याही नोकरी वर व आर्थिक मिळवतीवर नियुक्त नव्हते. ब्रिटिश काळात ब्रिटिशांनी शिक्षण व नोकरी चे द्वार उघडे करून काही लोक शिकले तो अपवाद वगळता शिक्षण नोकरी तर सोडा पण माणसा सोबत माणसा सारखे राहण्यावर सुद्धां येथे बंदी होती. संविधान लागु झाले आणि सर्वांना सर्वच क्षेत्रात संधी निर्माण करून दिली म्हणून आज ओबीसी, एस सी, एसटी समुदायातील लोकांच्या घरात शिक्षण, नोकरी, हक्क अधिकार, व राजकीय पद पोहचले आहेत याची जाणीव ठेऊन, आणि येणाऱ्या पिढीला सुद्धां संविधानाचा फायदा व्हायला पाहिजे म्हणून संविधान समजून घेऊन त्याची जनजागृती करणे प्रत्येक भारतीय नागरिकांचे प्रमुख कर्तव्य आहे. संविधानाचा मोठा लाभार्थी असलेला ओबिसी समूदाय आज सुशिक्षित झालेला आहे. अपवाद वगळता ओबिसी समुदायाचे लोक संविधाना बाबत संवेदनशील नसल्याचे दिसून येते. जर ओबीसी समुदाय संवेदनशील नसेल आणि ओबीसी समुदायाने आज संविधाना बद्दल जनजागृती केली नाही तर सर्वात अगोदर ओबिसींचे हक्क अधिकार आणि मानवी स्वातंत्र्य धोक्यात येईल. एसटी प्रवर्गात आजही पाहीजे तसे शिक्षण व नोकरी चे प्रमाण वाढले नाही. याला जबाबदार शासन तर आहेच परंतु संविधानाला डोक्यावर घेऊन मिरवणारे लोकही आहेत. संविधान हे फक्त डोक्यावर घेऊन मिरवायचे नाही तर प्रत्येक डोक्यात पेरण्याचे आहे. प्रत्येक घरात संविधानाचा सन्मान होणे आवश्यक आहे. परंतु तसे होताना दिसत नाही. एस सी समुदायामध्ये सुद्धां बौद्ध लोक सोडले तर संविधाना विषयी पाहिजे तशी जागृती किंवा जाणीव राहलेली नाही. बहुतांश बौद्ध लोक भारतीय संविधानाला फक्त ते डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहले म्हणून माणतात म्हणजे केवळ डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहले म्हणून संविधानाचा सन्मान करणे हे राष्ट्रप्रेम मुळीच नाही. संविधान हे देशाचे आहे. म्हणून त्याचा सन्मान व जागृती करणे हे प्रत्येकांचे आद्य कर्तव्य आहे. बौद्धांनी संविधान डोक्यावर घेतल्यामुळे ओबीसी चे संविधानीक आरक्षण, शिक्षण व नोकरी चा फायदा घेतात ते सुद्धां म्हणतात कि संविधानाने बौद्धांना सवलती देते. असे जेव्हा कोणी बोलते तेव्हा त्यांच्या बुद्धीची किव येते. कारण संविधानाचा अभ्यास केला तर समजते की संविधान कोणत्याही जातीला कोणत्याही बाबतीत सुतभरही सवलत देत नाही. तर ओबीसी, एस सी, एस टी समुदायाला प्रत्येक क्षेत्रात संधी निर्माण करून देते. संधी आणि सवलत यामध्ये खुप फरक आहे. संविधान कधीच कोणत्याही प्रकारच्या भेदभावाचे समर्थन करत नाही. हे समजून घेण्यासाठी आम्हाला संविधान वाचावे लागेल, समजून घ्यावे लागेल आणि समजलेले संविधान इतरांना समजून सांगावे लागेल. संविधानाचा भाग चार जर बघितला तर आपल्या लक्षात येईल की संविधान कोणत्याही पद्धतीचा भेदभाव करत नाही. उलट मागास घटकांना प्रगतीच्या घटकांत आणण्याचे काम करत असते. वेगवेगळ्या योजना ज्या तयार होतात ह्या योजना राज्यकर्ते स्वतः तयार करत नाहीत. शेतकरी, विद्यार्थी, महिला यांचा सर्वांगीण विकास करण्याची जबाबदारी सरकारची आहे. आणि तसे ध्येय धोरणे सरकारला करावी लागतात. म्हणून शेतकऱ्यांसाठी वेगवेगळ्या योजना, विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या योजना तयार करण्यात येतात. काही वेळा काही योजनेचा लाभ सर्वच शेतकऱ्यांना होत नाही त्याला कारणीभूत सत्तेत बसलेले लोक असतात. जातीची व भ्रष्टाचाराची घाण डोक्यात असल्याने अनेक योजना सत्तेतील गोचीड खातात तो भाग वेगळा असला तरीही प्रत्येक शेतकऱ्यां साठी सारखीच योजना असते. सध्या लाडक्या बहिणीचे लाभार्थी बहुतांश महिला आहेत. ही योजना महिलांचे जीवनात उंचावण्यासाठी तयार केलेली असुन कोणत्याही मागास समुदायामधील महिलेले सोबत भेदभाव झालेला नाही. थोडक्यात काय तर संविधान प्रत्येक नागरिकां सोबत समान संधी व समता प्रस्थापित करते आणि कोणावरही अन्याय होऊ देत नाही हे समजून घेणे गरजेचे आहे. देशात जातीभेद आणि अस्पृश्यता प्रमाणापेक्षा ही जास्त पसरली होती. लोकांना समतावादी संस्कारापेक्षा विषमतावादी व माणुसकी हीन संस्कार जास्त आपुलकी चे वाटत होते व आजही बऱ्याच ठिकाणी विषमतेचे उदाहरण समोर येत असतात. समाजातील प्रत्येक समुदायाला समान प्रतिनिधित्व मिळावे व त्यांचे शिक्षण, नोकरी व राजकारण यामधील प्रमाण वाढावे म्हणून आरक्षण आहे. आरक्षण हे केवळ एका जातीला नसुन ओबीसी च्या ३४६ जाती, एस टी च्या ४७ जाती आणि एस सी ५९ च्या जाती आणि ींक्ष पीं ५८ जातीला आरक्षण महाराष्ट्रात आहेत. बरेच लोक संविधान समजून न घेता, स्वतः च्या प्रगतीचा मार्ग समजून न घेता आरक्षणाचा फायदा घेणारेच आरक्षणाला विरोध करतात तेव्हा त्यांच्या बुद्धीची किव येते. आरक्षणाकडे द्वेषाने बघणारेच आरक्षणाचे लाभार्थी आहेत याची जाणीव ज्यांना नसेल ते हुशार आहेत असे म्हणणे म्हणजे स्वतः लाही अज्ञानाच्या यादीत समाविष्ट केल्यासारखे आहे. देशाचा राज्यकारभार कशाप्रकारे असावा, सरकारने नागरिकांची प्रगती होण्यासाठी कोणकोणत्या बाबींवर भर द्यावा यासाठी केवळ भारताचे संविधान आहे. विषमतेमध्ये एकता, अनेक धर्मामध्ये समता प्रस्थापित करण्याचे काम भारताचे संविधान करते. संविधाना नुसार देशात जाती धर्माला नाही तर माणसाला आणि माणसाच्या कर्माला प्राधान्य दिलेले आहे. संविधानाने नागरिकांची ओळख धर्माच्या, जातीच्या नावावर नाही तर भारताच्या नावावर भारतीय म्हणून करून दिलेली आहे. म्हणून प्रत्येकाला भारतीय असण्याचा गर्व असला पाहिजे. जाती धर्माचा जर गर्व निर्माण होत असेल तर आपण चुकिच्या अर्थात देशद्रोहाच्या मार्गावर जात आहेत. आणि ही खुप गंभीर बाब आहे हे ही समजून घेणे आवश्यक आहे. एकिकडे संविधानाला पंचेहत्तर वर्षे झाले आहेत तर दुसरीकडे संविधान अजूनही घराघरात पोहचले नाही यांची खंत आहे पण घराघरात संविधानाचा लाभार्थी आहे याचा आनंदही आहे. म्हणून संविधान समजून घेतांना आपल्याला डोळस पणे परिस्थिती समजून घेऊन त्यावर जागृती करणे आवश्यक आहे.

संविधान दिनांच्या सर्वांना मंगलमय सदिच्छा.



– विनोद पंजाबराव सदावर्ते,
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००

## संपादकीय....

## ईडीची कारवाई

सुमारे ५०० कोटी रुपयांच्या कथित घोटाळ्याप्रकरणी सक्तवसुली संचालनालयाने दिल्ली- राष्ट्रीय राजधानी क्षेत्रात (एनसीआर) बांधकाम कंपन्यांशी संबंधित सुमारे डझनभर ठिकाणी सोमवारी छापे मारले. अधिकृत सूत्रांनी ही माहिती दिली. ओरिस इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., ग्रीनबे इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. आणि थी सी शेल्टर प्रा. लि. या कंपन्या तसेच त्यांचे प्रवर्तक विजय गुप्ता, अमित गुप्ता, सरदार निर्मल सिंग आणि अन्य काही संचालक यांच्यावर हे छापे मारण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. ईडीच्या गुरुग्राम विभागीय कार्यालयाने ही छापेमारी केली. दिल्ली पोलिसांची आर्थिक गुन्हे शाखा आणि गुरुग्राम पोलिस यांच्याकडे दाखल करण्यात आलेल्या एफआयआरप्रकरणी ईडीकडून भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या तरतुदींअंतर्गत तपास सुरू आहे. या कंपन्यांच्या गृहप्रकल्पांमध्ये गुंतवणूक केलेल्या खरेदीदारांनी याप्रकरणी तक्रारी केल्या होत्या. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या बांधकाम कंपन्यांचे प्रवर्तक, भागधारक आणि संचालक यांच्या लाभासाठी घोटाळा, गैरव्यवहार आणि ५०० कोटी रुपयांहून अधिक रकमेचे हस्तांतरण केल्याच्या आरोपांप्रकरणी ईडी तपास करत आहे. या बांधकाम कंपन्यांनी एक हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम गोळा केली, परंतु केवळ ५०० कोटी रुपये प्रत्यक्ष प्रकल्पांवर खर्च केले. एवढेच नव्हे, तर परवाना असलेल्या जमिनीची घोटाळा करून विक्री करणे आणि पुढील गुंतवणुकीसाठीचा निधी अन्यत्र वळवणे या कारणांमुळे या प्रकल्पांचे काम थांबले, असा आरोप आहे. लोकसभा निवडणुकीच्या निकालासंबंधी सट्टेबाजी तसेच आयपीएल क्रिकेट सामन्यांचे बेकायदा प्रसारण यामध्ये सहभागी असलेल्या ‘फेअरप्ले’ या वेबसाइटविरोधातील भ्रष्टाचार प्रकरणी, सक्तवसुली संचालनालयाने आणि २१९ कोटी रुपयांची मालमत्ता गोठवली आहे. ईडीने प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनानुसार, ‘फेअरप्ले’ नावाच्या वेबसाइटविरोधातील या प्रकरणात मागील आठवड्यात मुंबई-ठाण्यासह अजमेर (राजस्थान), कच्छ (गुजरात), दमण येथील भूखंड, सदनिका, गोदामे तसेच डिमॅट खाती आदी मालमत्ता गोठवण्याचे हंगामी आदेश भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये देण्यात आले होते. या प्रकरणी ईडीने आधी १०० कोटींच्या मालमत्ता गोठवल्या होत्या. गोठवलेल्या एकूण मालमत्तांचे मूल्य ३३१ कोटींवर गेले आहे. मुंबई पोलिसांच्या सायबर कक्षात याबाबत तक्रार दाखल करण्यात आली होती. क्रिश लक्ष्मीकांत शहा हा प्रामुख्याने दुबईहून फेअरप्ले वेबसाइटचा कारभार चालवत होता.

## संविधान दिनाचे महत्त्व

१)डॉ. बी आर आंबेडकर यांना संविधानाचे जनक म्हणून ओळखले जाते..

२) सन २०१५ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त २६ नोव्हेंबर हा दिवस भारतामध्ये संविधान दिन म्हणून साजरा केला जातो.

३) संविधान दिनाचा उद्देश भारतीय संविधानाचे महत्त्व सांगणे हा आहे.

४) संविधान भारताला सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, प्रजासत्ताक म्हणून घोषित करते हे भारतीय नागरिकांना न्याय, समानता,आणि स्वातंत्र्याची हमी देते आणि बंधुत्व वाढवण्याचा प्रयत्न करते.

५) भारताची राज्यघटना ही जगातील सर्वात मोठी लिखित राज्यघटना आहे.

६) भारतीय संविधानाने देशाप्रती नागरिकांचे मूलभूत अधिकार मूलभूत तत्वे आणि कर्तव्य यांची तरतूद केली आहे. ही माहिती जाणून घेतल्याने आपल्या जीवनात संविधानाचे महत्त्व समजण्यास मदत होते संविधान दिन आपल्याला नागरिक म्हणून आपले हक्क आणि जबाबदाऱ्या आणि आपल्या देशाच्या मूल्यांची आठवण करून देते.

संविधान दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा..

**सुधाकर माणिकराव रणदिवे**
**दै. यश सिद्धी न्यूज धाराशिव जिल्हा प्रतिनिधी.**

## भारताचा ऑस्ट्रेलियावर ऐतिहासिक विजय

(पान १ वरून...) भारताकडून जसप्रीत बुमराहने ५ विकेट्स घेतले. तर पदार्पणवीर हर्षित राणाने ट्रेव्हिस हेडला क्लीन बोल्ड करत त्याची पहिली आंतरराष्ट्रीय कसोटी विकेट मिळवली, यासह त्याने पहिल्याच सामन्यात ३ विकेट्स मिळवल्या. तर सिराजने २ विकेट्स आपल्या नावे केला.

भारतीय संघ पहिल्या डावातील ४६ धावांच्या आघाडीसह फलंदाजी करण्यासाठी उतरला. दुसऱ्या डावात तर भारताच्या सलामीवीरांनी ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजांना विकेट्ससाठी तंगवलं. केएल राहुल आणि यशस्वी जैस्वालने २०१ धावांची ऑस्ट्रेलियामध्ये भारताकडून सर्वात मोठी भागीदारी रचत मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. यशस्वी जैस्वालने पहिल्याच ऑस्ट्रेलिया कसोटीतील पहिल्या कसोटीत शतक झळकावत इतिहास घडवला. यशस्वीने १६१ धावांची तर राहुल ७७ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. तर त्यानंतर ऑस्ट्रेलियासाठी कायमचं कर्दनकाळ ठरलेल्या विराट कोहलीने आपल्या पुनरागमनाचा डंका वाजवत १४३ चेंडूत वादळी शतक झळकावले.

विराट कोहलीच्या शतकासह भारताने दुसऱ्या डावात ६ बाद ४८७ धावा केल्या. यासह भारताने ५३३ धावांची आघाडी घेत डाव घोषित केला. यानंतर भारताने तिसऱ्या दिवशीच ऑस्ट्रेलियाला फलंदाजीसाठी बोलावले आणि ३ विकेट्स चटकावले. चौथ्या दिवशी भारताने तिसऱ्या सत्रापर्यंत ऑस्ट्रेलियाला ऑल आऊट करत ऐतिहासिक विजयाची पर्थ स्टेडियमवर नोंद केली. दुसऱ्या डावात भारताकडून जसप्रीत बुमराह आणि मोहम्मद सिराज यांनी प्रत्येकी ३ विकेट्स घेतले. तर वॉशिंग्टन सुंदरने २ विकेट्स, हर्षित राणा आणि नितीश रेड्डीने १ विकेट घेत भारताच्या विजयात महत्त्वपूर्ण भूमिका बजवली.

## भिवंडी ग्रामीण मध्ये शिंदे सेनेचे शांताराम मोरे विजयी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भिवंडी/प्रतिनिधी : भिवंडी ग्रामीण विधानसभा मतदार संघातून शिवसेना शिंदसेनेचे शांताराम मोरे विजयी झाले आहेत. शांताराम मोरे यांना एकूण १२७२०५ मते मिळाली असून त्यांचे प्रतिस्पर्धी उद्धव सेनेचे महादेव घाटाळ यांना एकूण ६९२४३ मते मिळाली.शांताराम मोरे हे ५७९६२ मतांनी विजयी झाले आहेत.या विजयाने शांताराम मोरे यांनी विजयाची हेट्रिक साधली आआहे. मोरे यांच्या विजयानंतर मोरे समर्थकांनी मतमोजणी केंद्राबाहेर फटाके फोडत व गुलाल उधळत एकच जल्लोष साजरा केला. राज्य शासनाच्या माध्यमातून केलेल्या विकास कामांमुळे ग्रामीण जनतेने माझ्या बाजूने कौल दिल्याने मी विजयाची हॅट्रिक साधू शकलो,येणाऱ्या काळात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली भिवंडी ग्रामीण मतदार संघाचा जास्तीत जास्त विकास करणार असून सर्व मतदारांनी माझ्यावर दाखविलेल्या विश्वासाला कोठेही तडा जाऊ देणार नाही अशी प्रतिक्रिया विजयी उमेदवार आ.शांताराम मोरे यांनी दिली आहे.

## कराटे स्पर्धेत यश वाघ याचे घवघवीत यश; विभागीय स्पर्धेसाठी निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधी : डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी यश कैलास वाघ याने जिल्हास्तरीय कराटे स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले असून त्याची धुळे येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

महाराष्ट्र शासन जिल्हा क्रीडा अधिकारी नाशिक यांच्या वतीने नाशिक या ठिकाणी कराटे स्पर्धा संपन्न झाली .यश याने सतरा वर्षाखाली व ८२ किलो वजन गटात मुलांच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाला.




त्याला क्रीडा शिक्षक शिवाजी गुरुळे यांचे मार्गदर्शन लाभले . त्याच्या यशाबद्दल मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस एडवोकेट नितीन ठाकरे, तालुका संचालक कृष्णाजी भगत संस्थेचे शिक्षणाधिकारी डॉ. भास्कर ढोके ,शालेय समितीचे अध्यक्ष नारायणशेठ वाजे, उच्च माध्यमिक समितीचे अध्यक्ष विठ्ठलतात्या वामने ,पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष सोमनाथ वारुंगसे, विद्यालयाचे मुख्याध्यापक रामदास वाजे आदींसह शालेय समिती सदस्य,शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतुक केले आहे .

त्याचे व मार्गदर्शक शिक्षक यांचा विद्यालयाच्यावतीने विद्यालयाचे मुख्याध्यापक रामदास वाजे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी दिगंबर जाधव , पी.आर. करपे, सोमनाथ गिरी आदींसह कर्मचारी उपस्थित होते.

## आ. सुभाष देशमुख यांचा दणदणीत विजय, हॅट्रिक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार आ सुभाष देशमुख यांना ७७,१२७ मताने विजय, प्रतिस्पर्धी उमेदवाराचे डिपॉझिट जप्त

सोलापूर सोलापूर जिल्ह्यातील दक्षिणमधून महायुतीचे अधिकृत उमेदवार आ. सुभाष देशमुख यांनी उभाटा घाटाची उमेदवार अमर पाटील यांचा पराभव करून सत्यात हजार एक शे सत्तावीस विजय मिळवीत दक्षिणमधून त्यांनी हॅट्रिक केली आहे.

निवडणुकीत चुरस असणारे अपक्ष उमेदवार श्री धर्मराज काढा दि यांना अठरा हजार ७४७ एवढी मती मिळाली त्यामुळे दक्षिण मधील निवडणूक एकतर्फी झाल्याचे दिसून येत आहे.

आमदार सुभाष जोब देशमुख यांना लाडक्या बहिणीचा भरभरून पाठिंबा मिळाल्यामुळे मते अधिक की त्यांचे वाढलेले आहे अपेक्षा पेक्षा त्यांना जास्त मते मिळाली आहेत.

एकूण दक्षिण मध्ये २२ उमेदवार रिंगणात होते त्यामध्ये मनसेचे उमेदवार कोणापुरे, ओबाडाची अमर पाटील, अपक्ष धर्मराज काढादी, तसेच प्रहारचे बाबा मिस्त्री, या मतदारसंघांमध्ये लिंगायत समाजाचे मताधिके जास्त आहे त्याचा फायदा मतामध्ये पोट पडून आमदार सुभाष देशमुख यांना यांचा फायदा होणार असे दिसून येत होते.

आमदार सुभाष बापू देशमुख यांना लाडक्या बहिणीचा मोठ्या प्रमाणात मताधिक्य मिळवून देण्यात फायदा झाला आहे. आमदार सुभाष बापू देशमुख यांना ७७,१२७ मते मिळवून त्यांनी विजयी संपादन केला आहे. त्याचबरोबर उभाटा गटाची यांना ३९ हजार ८०५ तर अपक्ष धर्मराज काडादी यांना १८, ७४७ एवढी मते मिळाले आहेत व बाकीच्या सर्व उमेदवाराचे डिपॉझिट जप्त करण्यात जप्त झाले आहेत.

आमदार सुभाष बापू देशमुख विजय झाल्यानंतर सोलापूरसह दक्षिण शंकर नगर बुद्रुक भंडारकवठे, लवंगी विरोध, वांदी कागल गाव, मतदारांमध्ये जल्लोष करण्यात आला व उमेदवाराचे डिपॉझिट जप्त करण्यात आले.



पक्षनिष्ठा व प्रामाणिकपणा याची मिळालेली पोचपावती आहे: आ. सुभाष बापू देशमुख, निवडणुकीपूर्वी माहिती सरकारने लाडके बहीण योजना काढल्यामुळे या योजनेचा फायदा माहिती सरकारला झाला आहे व त्यांना मोठ्या प्रमाणात माहिती सरकारला आशीर्वाद दिले आहे त्यामुळे माहिती सरकार सत्तेवर आले आहे असा विश्वास आमदार सुभाष बापू देशमुख यांनी प्रसिद्ध माध्यम आज बोलताना त्यांनी आपले मत व्यक्त केले होते.

आमदार सुभाष बापू देशमुख यांनी दहा वर्षांमध्ये केलेले कामाचे प्रामाणिकपणा आणि लोकांची केलेली सेवा याची मला जनतेतून पोचपावती दिली आहे आणि मला ७७,१२७ मतांनी भरभरून विजय मला मताधिके देऊन विजय मिळवून दिला आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...




### अज्ञात चोरट्याने घराजवळून दुचाकी पळवली

सोलापूर, (प्रतिनिधी) : राहत्या घराजवळ हॅण्डल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३.एएम.२८६१ ही दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २१ नोव्हेंबर रोजी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास शांतीनगर मजरेवाडी येथे घडली. याप्रकरणी रशीद उमरअली बागवान (वय-४८,रा.शांतीनगर,मजरेवाडी) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार उबाळे हे करीत आहेत.

### किरकोळ कारणावरून लाथा बुक्क्यांनी मारहाण; चौघांवर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : किरकोळ कारणावरून शिवीगाळ करत लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २३ नोव्हेंबर रोजी रात्री सात वाजण्याच्या सुमारास शोभा देवी नगर नई जिंदगी येथे घडली. याप्रकरणी इस्माईल फारुख उस्ताद (वय-२६,रा.शोभादेवी नगर,नई जिंदगी) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून उजेर दफेदार, अमन मेहबूब शेख, अबरार मंगलगिरी व फैजन उर्फ एफ के यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी यांची आई आयेशा या नळाला पाणी भरत असताना तेथे उभे असलेले वरील संशयित आरोपी यांना बायका पाणी भरत आहे. तुम्ही येथे थांबू नका असे सांगत असताना अमन शेख याने तुला काय मस्ती आली आहे असे म्हणून शिवीगाळ केली. त्यावेळी फिर्यादी व त्यांचा भाऊ इब्राहिम असे भांडण सोडवण्यासाठी गेले असता उजेर दफेदार याने रस्त्यावर पडलेला दगड फिर्यादीच्या कानावर मारून दुखापत केली व तसेच त्यांच्या आईला देखील दगडाने मारून जखमी केले. दरम्यान, अबरार व फैजन यांनी देखील भाऊ इब्राहिम याला लाथा बुक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळ केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास पोलीस हवालदार पवार हे करीत आहेत.

### रंगभवन येथून महिलेच्या पर्समधून ८२ हजाराचे दागिने लंपास

सोलापूर, (प्रतिनिधी) : रंगभवन येथील अक्कलकोट बस स्टॉप येथे बस थांबली असता, त्यावेळी कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादी वंदना बसवराज गुंदगे (वय-४०,रा.गुरूवार पेठ) यांच्या पर्सची चैन उघडून त्यातील एक तोळ्याचे सोन्याचे लहान मुलांच्या पाटल्या व एक तोळ्याचे चांदीचे वाळे असा एकूण ८२ हजार ८०० रुपये किमतीचा ऐवज चोरून नेला आहे.ही घटना २४ नोव्हेंबर रोजी दुपारी सव्वा दोन वाजण्याच्या दरम्यान रंगभवन येथे घडली. याप्रकरणी वंदना गुंदगे यांनी जेलरोड पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हवालदार शेख हे करीत आहेत.

# सोलापूर जिल्ह्याचा पालकमंत्री कोण? सुभाष देशमुख, विजय देशमुख की सचिन कल्याणशेट्टी

## सोलापूर जिल्ह्याला दोन मंत्रीपदे मिळणार असल्याचे सूत्रांकडून माहिती





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टी म हायुतीला मिळालेल्या अभूतपूर्व यशानंतर आता कोण कोण मंत्री होणार याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

सोलापूर जिल्हा हा या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस मुक्त झाल्याचे पाहायला मिळाले. भारतीय जनता पार्टीचे तब्बल पाच आमदार जिल्ह्यात निवडून आले आहेत.

सलग पाच वेळा आमदार होण्याचा मान विजयकुमार देशमुख यांनी मिळवला असून त्यानंतर सलग तीन वेळा सुभाष देशमुख हे आमदार झाले आहेत आणि सलग दोन वेळा अक्कलकोटचे सचिन कल्याणशेट्टी आणि मंगळवेढ्याचे समाधान आवताडे ते आमदार झाले आहेत.

यापूर्वी आमदार विजयकुमार देशमुख आणि आमदार सुभाष देशमुख यांना मंत्रिपद मिळाले होते. आता या दोघांमध्ये भाजप कोणाला मंत्री करते याची उत्सुकता आहे. दरम्यान मुंबईतील सूत्रांकडून मि ळालेल्या माहितीनुसार सोलापूर जिल्ह्यात दोन मंत्री पदे मिळणार आहेत. एक कॅबिनेट आणि दुसरा राज्यमंत्री. त्यामुळे आता सुभाष देशमुख, विजयकुमार देशमुख आणि सचिन कल्याणशेट्टी या तिघांपैकी कोणाच्या गळ्यात मंत्रिपदाची माळ पडणार याची उत्सुकता आहे.

पण दोन्ही देशमुख आमदार हे ज्येष्ठ आहेत. त्या दोघांनाही मंत्रिपद मिळणार की, या दोघांपैकी एकाला संधी मिळणार तसेच देवेंद्र फडणवीस यांच्या अतिशय निकटवर्तीय मानले जाणारे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना सुद्धा मंत्रिपदाची लॉटरी लागण्याची शक्यता आहे. गेल्या पाच वर्षात परका पालकमंत्री सोलापूर जिल्ह्याला मिळाला परंतु यंदा हक्काचा पालकमंत्री मिळणार आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्याचा पालकमंत्री आता कुणाच्या रूपात पाहायला मिळतोय हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## कोतुळचे भूमिपुत्र, मंगेश लोखंडे बेस्ट प्रोजेक्ट मॅनेजर ऑफ द इयर २०२४ पुरस्काराने सन्मानित!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अकोले/प्रतिनिधी : अकोले तालुक्यातील मुळा परिसरातील कोतुळ येथील सेवावृत्त शिक्षक नारायण लोखंडे यांचे चिरंजीव मंगेश लोखंडे, याना बेंगलोर येथे सन २०२४ या वर्षीचा बेस्ट प्रोजेक्ट ऑफ द इयर या पुरस्काराने नुकतेच सन्मानित करण्यात आले.

मंगेश लोखंडे हे कोतुळेश्वर विद्यालयात १० वि च्या वर्गात पहिले आले होते, पुढील शिक्षण संगमनेर येथील सह्याद्री विद्यालयात पूर्ण करून, पुणे येथे उजएझ कॉलेज ऑफ इंजिनियरिंग येथे मेकॅनिकल पदवी मिळविली, व पुणे येथील इन्फोसिस या नामांकित कंपनीत त्यांना नोकरी मिळाली, त्यांची चमकदार कामगिरी लक्षात येताच कंपनीने त्यांचेवर मॅनेजर पदाची जबाबदारी सोपविली, ही जबाबदारी अत्यंत प्रभावीपणे राबविल्याने त्यांना



बंगलोर येथे सन २०२४ चा बेस्ट प्रोजेक्ट मॅनेजर ऑफ द इयर या म हत्वपूर्ण पुरस्काराने नुकतेच सन्मानित करण्यात आले,

कोतुळ येथील या लोखंडे परिवारात संजय, मंगेश ,प्रशांत, उद्योजक राजेंद्र तिघेही भाऊ उच्चशिक्षित असून त्यांचा जन्म अत्यंत गरीब शेतकरी कुटुंबात झालाआहे,

चिकाटी, कठोर ,परिश्रम ,जिद्द समोर ठेऊन मंगेशने कोतुळ व परिसरात आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे, काकांचा आदर्श समोर ठेऊन सुयश सुजित हे सुद्धा इंजिनियरिंगचा अभ्यास करीत आहेत, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक गावकरीचे संपादक डॉ विश्वासराव आरोटे यांचे ते मेहुणे आहेत,तर कोतुळ ग्राम पंचायतीचे माजी उपसरपंच, भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय लोखंडे यांचे ते बंधू आहेत,नुकत्याच ३ वेळा एम पीएससी उत्तीर्ण होऊन डीवायएसपी पदी निवड झालेल्या शिवा अश- ोक शेळके यांचे ते अत्यंत निकटचे मित्र असून मंगेश लोखंडे यांचा हा कार्यसन्मान उल्लेखनीय असल्याचे त्यांनी म्हटले आहे,

अकोले तालुक्याचे नवनिर्वाचित खा भाऊसाहेब वाकचौरे.खा निलेश लंके आमदार डॉ, किरणजी लहाम टे, माजी आमदार वैभव पिचड. सहकार महर्षी सिताराम गायकर ज्येष्ठ नेते शिवाजी राजे धुमाळ , ब्राम्हणवाडा पतपेढीचे माजी अध्यक्ष विलासराव आरोटे यशोमंदिर पतपेढीच्या संचालिका कल्पना आरोटे.भाजप तालुका अध्यक्ष सिताराम भांगरे, गणेश पोखरकर महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष ,अशोकराव शेळके, सुनील गीते ,रवी आरोटे,डॉ,पप्पू (अभिजित) देशमुख ,बबलू पाटील देशमुख , हेमंत देशमुख,राजू पाटील देशमुख.. आदींनी अभिनंदन केले, तर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस विश्वासराव आरोटे यांनी मंगेश यास पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्यावर स्व. कर्मवीर औदुंबर अण्णांची १०१वी जयंती साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील बेनू नगरी गुरसाळे येथील श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक चेअरमन स्वर्गीय औदुंबर अण्णा पाटील १०१वी जयंती साजरी करण्यात आली.

याप्रसंगी कारखाना कार्यस्थळातील स्वर्गीय कर्मवीर औदुंबर अण्णा पाटील यांचे पूर्णाकृती विधी पूर्व पूजा कारखान्याचे चेअरमन आमदार श्री अभिजीत आबा पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

सदर कार्यक्रमास कारखान्याचे व्हाईस चेअरमन सौ प्रेम लता रोंगे तसेच संचालक सर्व श्री सुरेश भुसे, सचिन सपाटे, प्रवीण कोळेकर, विठ्ठल रणदिवे, तज्ञ संचालक दशरथ जाधव, आनंद चिखलकर समाधान गाजरे कार्यकारी संचालक श्री आर बी पाटील जनरल मॅनेजर श्री डी आर गायकवाड श्री विठ्ठल प्रशालेचे सर्व स्टाफ कारखान्याची सभासद कार्यकर्ते ऊस तोडणी वाहतूक ठेकेदार सर्वाधिकारी कर्मचारी वर्ग हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते उपस्थित सर्व संचालक मान्यवरांच्या याप्रसंगी स्वर्गीय कर्म आजोबांना पाटील यांना आदरांजली वाहिली



## जिल्ह्यातील करमाळा, माढा, सोलापूर शहर मध्य व सोलापूर दक्षिण या मतदार संघामध्ये मतदान व मतमोजणी मधील आकडेवारीत तफावत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



सोलापूर (जिमाका) : विधानसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ च्या मतमोजणीचा निकाल दिनांक २३ नोव्हेंबर २०२४ रोजी जाहीर झाला. त्याअनुषंगाने राज्यातील विविध मतदार संघात निवडणुकीसाठी प्रत्यक्ष झालेले मतदान आणि मतमोजणी दिवशी ईव्हीएम मध्ये आलेले आकडे यात तफावत असल्याची बाब राज्यातील विविध वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्याचे निर्देशनास आले आहे.

त्यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील २४४-करम ाळा, २४५- माढा, २४९-सोलापूर शहर मध्य, २५१- सोलापूर दक्षिण या मतदार संघामध्ये म तदान व मतमोजणी मधील आकडेवारीत तफावत दिसून आली. त्याचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे.

२४४- करमाळा या विधानसभा मतदारसंघाम ध्ये मतदानादिवशी २ लाख २९ हजार ३७५ अशी मतदानाची आकडेवारी नोंदवली गेली. तथापि मतमोजणी दिवशी २ लाख २९ हजार ३७७ अशी मतदानाची आकडेवारी दिसून आली. यामध्ये २ मताची वाढ ही केंद्राध्यक्ष केंद्र क्र.११५ यांनी नमुना १७ सी मध्ये मतांचा हिशोब लिहीताना चुकीची नोंद घेतल्याने झाली. सदरची मानवीय चुकीमुळे मतमोजणीच्या दिवशीच्या अहवालाम ध्ये तफावत दिसून येते.

२४५-माढा या विधानसभा मतदारसंघामध्ये मतदानादिवशी २ लाख ६७ हजार ६९१ अशी मतदानाची आकडेवारी नोंदवली गेली. तथापि मतमोजणी दिवशी २ लाख ६७ हजार २१ अशी मतदानाची आकडेवारी दिसून आली. यामध्ये ६७० मताची घट आढळून आली. सदरील बाब ही केंद्र क्र.१४९ केंद्राध्यक्ष यांनी मॉकपोल वेळी नोंदवलेली मते उठउ न केल्यामुळे निवडणूक निर्णय अधिकारी यांचे हस्त पुस्तिकामधील तरतुदीन- ुसार निवडून आलेल्या उमेदवाराची मतांची तफावत ही सदर केंद्रावर नोंदवण्यात आलेल्या मतापेक्षा अधिक असल्यामुळे सदर केंद्राची ६७० मते मतमोजणी दिवशी मोज- ली नाहीत त्यामुळे मतमोजणीच्या दिवशीच्या अहवालामध्ये तफावत दिसून येते.

२४९-सोलापूर शहर मध्य या विधानसभा मतदारसंघामध्ये मतदानादिवशी २ लाख २९१ अशी मतदानाची आकडेवारी नोंदवली गेली. तथापि मतमोजणी दिवशी २ लाख २८९ अशी मतदानाची आकडेवारी दिसून आली. यामध्ये २ मताची घट आढळून आली. सदरील बाब ही केंद्राध्यक्ष केंद्र क्र.१९७ यांनी केंद्राध्यक्ष दैनंदिनीमध्ये २ प्रदत्त मते ईव्हीएम म तांच्या हिशोबात गृहीत धरल्याने ६६५ मते नमुद केली तथापि मततोजणीच्या दिवशीच्या ईव्हीएम मध्ये ६६३ मते आढळून आली. सदरील मानवीय लेखन चुकीमुळे मतमोजणीच्या दिवशीच्या अह- वालामध्ये तफावत दिसून येते.

२५१-सोलापूर दक्षिण या विधानसभा म तदारसंघामध्ये मतदानादिवशी २ लाख २३ हजार ६२४ अशी मतदानाची आकडेवारी नोंदवली गेली. तथापि मतमोजणी दिवशी २ लाख २३ हजार ६२५ अशी मतदानाची आकडेवारी दिसून आली. यामध्ये १ मताची वाढ दिसून आली. सदरील बाब केंद्राध्यक्ष यांनी १ ईलेक्शन ड्युटी सर्टिफिकेट चे मत गृहीत न धरल्यामुळे ६७६ मते असा हिशोब केंद्राध्यक्ष दैनंदिनीमध्ये नमुद केला. त्यामुळे मतमोजणीच्या दिवशी ईव्हीएम मध्ये ६७७ मते आढळून आले. सदरील मानवीय लेखन चुकीमुळे मतमोजणीच्या दिवशीच्या अह- वालामध्ये तफावत दिसून येते. अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली आहे.

**स्वेरीच्या संशोधन विभागाला दिली बिजलानी व गाडगीळ यांनी सदिच्छा भेट**

**सामाजिक उपक्रमांची घेतली माहिती**

# स्वेरीचे उपक्रम हे विद्यार्थ्यांसाठी लाभदायक : आर. एस. व्ही. पी.चे योगेश बिजलानी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : 'स्वेरीचा कॅम्पस, शैक्षणिक उपक्रम व कल्चर पाहता ग्रामीण भागात एवढ्या मोठ्या प्रमाणात संशोधनाचे जाळे विण- लेले पाहून विद्यार्थ्यांचे तंत्रज्ञानातील योगदान हे करिअर करताना महत्वाचे ठरणार आहे यात शंका नाही.' असे गौरवोदगार आर. एस. व्ही. पी. (गव्हर्मेंट ऑफ इंडिया) चे योगेश बिजलानी यांनी काढले.

गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या कॅम्पसला गव्हर्न्मे ट ऑफ इंडियाच्या प्रिन्सिपल सायंटीफिक अॅडव्हायजर ऑफीसच्या आर. एस. व्ही. पी. (रुटॅग स्मार्ट व्हिलेज प्रोग्राम) चे योगेश बिजलानी, डिसॉल्ट सिस्टम फाऊंडेशनचे प्रोग्राम डायरेक्टर हेमंत गाडगीळ व इतर म




**स्वेरीच्या कॅम्पसला गव्हर्मेंट ऑफ इंडियाच्या आर. एस. व्ही. पी.चे योगेश बिजलानी, डिसॉल्ट सिस्टम फाउंडेशन चे प्रोग्राम डायरेक्टर हेमंत गाडगीळ व इतर सहकाऱ्यांनी सदिच्छा भेट दिली याप्रसंगी त्यांचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी डावीकडून हेमंत गाडगीळ, योगेश बिजलानी, डॉ. हर्षवर्धन रोंगे,, इतर सहकारी, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ.डी.ए.तंबोळी आदी. तसेच हेमंत गाडगीळ, योगेश बिजलानी व पाहुण्यांना प्रकल्पांची महिती देताना डॉ. एम.एम. आवताडे.**

ान्यवरांनी सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी सल्लागार बिजलानी गौरवोदगार काढत होते. '१९९८ साली स्वेरीने ग्रामीण भागात तंत्रशिक्षणाची मुहूर्तमेढ पंढरीच्या पायथ्याशी अर्थात गोप- ाळपूरमध्ये रोवली त्यामुळे पंढरीच्या शैक्षणिक वैभवात आणखी भर पडली असून अफाट परिश्रम घेत आज स्वेरीच्या बीजाचे रुपांतर वटवृक्षात झाले आहे. स्वेरीच्या शैक्षणिक व सामाजिक अशा अनेक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या बौद्धीक विकासास हातभार लागत आहे. स्वेरीचे शिक्षण क्षेत्रातील योगदान जसजसे लक्षवेधी ठरत आहे तसतसे माळरानावरील या शैक्षणिक संकुलाला भेट देणाऱ्यांची संख्याही दिवसोंदिवस वाढत आहे. अशात कॅम्पसला आर. एस.व्ही.पी.चे योगेश बिजलानी, डिसॉल्ट सिस्टम फाउंडेशन चे प्रोग्राम डायरेक्टर हेमंत गाडगीळ व इतर मान्यवरांनी सदिच्छा भेट दिली. संस्थेच्या वतीने यावेळी पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. योगेश बिजलानी व हेमंत गाडगीळ यांनी संशोधन विभागाची प्रगती सविस्तरपणे जाणून घेतली. स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या दिशादर्शक मार्गदर्शनाखाली, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाख- ेचे अधिष्ठाता डॉ. पी.एम. पवार यांच्या प्रमुख नेतृत्वाखाली संशोधन विभागाला गती आली आहे. कॅम्पसम ध्ये संशोधन कल्चर असल्यामुळे विद्यार्थ्यांचा कल देखील साहजिकच संशोधनाकडे अधिक असल्याचे जाणवते. यावेळी पाहुण्यांनी संशोधन विभागाबरोबरच इतर विभागांना भेट देऊन माहिती जाणून घेतली. उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, डॉ. हर्षवर्धन रोंगे, डॉ. एम.एम. आव- ताडे आदी प्राध्यापकांकडून संशोधन प्रकल्प, रुरल ह्युमन रिसोर्स डेव्हलपमेंट फॅसिलिटी (आरएचआरडीएफ), संशोधनासाठी मिळालेला निधी, शिक्षण पद्धती ट्रिपल पीई, स्वेरीम धील आंत्रप्रन्युअरशिप सुविधा व त्या अनुषंगाने असलेले उपक्रम, इफेक्टिव्ह टीचिंग-लर्निंग स्कीम, नाईट स्टडी, महाविद्यालयाला मिळालेली विविध मानांकने, स्पर्धा परीक्षेची तयारी, प्लेसमेंटच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी घेतलेली गरुड झेप, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी प्राणायम, आर्ट ऑफ लिव्हिंग सारखे प्रशिक्षण, विद्यार्थी व प्राध्यापक यांच्यातील आदरयुक्त शिस्त व मिळत असलेले संस्कार, विविध शैक्षणिक, विधायक व सामाजिक उपक्रमांची माहिती जाणून घेतली.

# महाविकास आघाडीचा अनपेक्षित पराभव अन् महायुतीची जोरदार मुसंडी

## विश्लेषण : योजनांमुळे जनमताचा कौल महायुतीकडे; लोकसभेच्या हाराकिरीनंतर भाजप सावध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/प्रतिनिधी : महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे निकाल म्हणजे हरियाणा निकालाची पुनरावृत्ती आहे, असे प्रारंभी म्हणावे लागेल. सर्व मान्यवरांचे, अभ्यासकांचे तर्क-वितर्क हरियाणामध्येही काँग्रेसचे सरकार येण्याचे चित्र मांडत असताना प्रत्यक्षात भाजपाने बाजी मारली. अगदी त्याचप्रमाणे इथेही चित्र फिरले आणि हरियाणाप्रमाणे मोजके राजकीय पक्ष नसूनही विजय खेचून आणण्यात महायुतीला मोठे यश मिळाले. अशा प्रकारचा पराभव अनपेक्षित असणाऱ्या महाविकास आघाडीला हा 'जोर का धक्का' म्हणावे लागेल.

संपूर्ण देशाचे लक्ष लागून असणाऱ्या महाराष्ट्रातील निवडणुकांच्या निकालातून कल स्पष्ट झाला असून लोकसभा निवडणुकीतील दारुण पराभवानंतर नव्या दमाने आणि जोमाने पुढे आलेला भारतीय जनता पक्ष आणि महायुतीने मारलेली मुसंडी हे लक्षवेधी मुद्दे आगामी काळातील राजकारणाचे वारे निर्देशित आणि नियमित करणारे ठरणार आहेत. राज्यातील या निवडणुकीला राजकीय अस्थैर्य, विरोधकांचा तीव्र आणि टोकाचा विरोध, दिवसामाजी बिघडत जाणारे सामाजिक वातावरण याची किनार होतीच, खेरीज बदलापूरचे बालिका अत्याचार प्रकरण, शिवाजीराजांचा पुतळा कोसळणे, मराठा आंदोलनाने वातावरण गढूळ होणे आदी कारणेदेखील होती. खोके सरकार, गद्दार, आमदार अपात्रतेच्या मुद्द्यांचा कोलाहलही पाठीमागे होताच. तशातच लोकसभा निवडणुकीमध्ये देशात जेमतेम तारल्या गेलेल्या भाजपाला राज्यातील जनतेने नाकारल्याचे चित्रही तणाव वाढवणारे होते. मात्र अशा तणावग्रस्त अवस्थेतही महायुतीने संयमाने आणि नेटक्या नियोजनानिशी परिस्थिती सावरली आणि नेत्यांपासून सर्वसामान्य कार्यकर्त्यांपर्यंत सगळ्यांनीच प्रयत्नपूर्वक जनमताचा कौल आपल्याकडे वळवण्यात यश संपादीत केले.

थोडक्यात, हा जनतेने घेतलेला एक निर्णय असला तरी त्याचे अनेक अन्वयार्थ निघतात. या काळात संपूर्ण देशाने योगी आदित्यनाथ यांच्या 'बटेंगे तो कटेंगे' तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या 'एक हैं तो सेफ है'चा नारा ऐकला. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीमध्ये तो लक्षवेधी ठरलेला दिसत आहे. त्यामुळेच महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालाचे कल भाजपाच्या नेतृत्वाखालील एनडीए आघाडीचे वादळ दर्शवत असणे स्वाभाविक आहे. महाराष्ट्रातील २८८ जागांमध्ये भाजपाच्या महायुती आघाडीला २०० हून अधिक जागा मिळणे जनतेचा बदलता कल स्पष्ट करणारे आहे. दुसरीकडे, उत्तर प्रदेशमध्ये नऊ विधानसभा जागांसाठी झालेल्या पोटनिवडणुकीत भाजपाला किमान सात जागा मिळताना दिसत आहेत. या विजयाचे प्रमुख कारण ध्रुवीकरण असल्याचे मानले जात आहे. अर्थातच याचे विश्लेषण होत राहणार आहे.



लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या विजयानंतर भाजपा सावध झाला. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महाविकास आघाडीला ४८ पैकी ३१ तर महायुतीला १७ जागा मिळाल्या. यानंतर भाजपा आणि संघाने आपली रणनीती बदलली. अत्यंत सावधगिरीने योगी आणि मोदींनी बाजी मारली. २०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीचे आकडे बघितले, तर भाजपाला १०५ जागा मिळाल्या होत्या. दुसरीकडे, शिवसेनेला (अविभाजित शिवसेना) ५६ जागा, राष्ट्रवादीला (अविभाजित राष्ट्रवादी) ५४ जागा आणि काँग्रेसला ४४ जागा मिळाल्या होत्या. त्यानंतर शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेसने मिळून सरकार स्थापन केले. मात्र, ही आघाडी जास्त काळ सरकार चालवू शकली नाही. जून २०२२ मध्ये शिवसेनेतील अंतर्गत वादामुळे एकनाथ शिंदे वेगळे झाले. अजित पवारांनी राष्ट्रवादीतील एक गट सोबत आणला. यानंतर ते एकनाथ शिंदे यांच्या भाजपा आणि शिवसेना सरकारमध्ये सामील झाले आणि उपमुख्यमंत्री झाले. राष्ट्रवादीच्या मतदारांना महायुतीकडे वळवण्यात या घटकांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्याच वेळी शिवसेनेच्या मतदारांना महायुतीशी जोडण्यातही शिंदे यांना यश आले. ताज्या निकालाने महाराष्ट्रातील मराठा फॅक्टर आणि बेरोजगारीचा मुद्दा महाविकास आघाडीच्या फायद्याचा राहिला नसल्याचे स्पष्ट केले आहे. किंबहुना, मतांच्या ध्रुवीकरणामुळे हे मुद्दे मागे पडले, असेही आपण म्हणू शकतो. त्याच वेळी देशभरात बळकट झालेल्या हिंदुत्वासारखा मुद्दा महायुतीने समोर आणला. महायुतीला अपेक्षेप्रमाणे योगी आणि मोदींच्या घोषणांची मोठी मदत मिळाली.

हरियाणामध्ये योगी आदित्यनाथ यांनी ही घोषणाबाजी केली आणि तिथे भाजपाचा विजय झाला. मात्र, भाजपाने योगींचे 'बटेंगे ते कटेंगे'असे बॅनर महाराष्ट्रात लावले तेव्हा तीव्र प्रतिक्रिया उमटल्या, कारण उत्तर प्रदेश किंवा हरियाणाप्रमाणे महाराष्ट्रामध्ये हिंदुत्व प्रचलित नाही. पण, निकाल समोर आल्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणातही ध्रुवीकरणाचे पर्व सुरू झाल्याचे जाणवले आहे. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने 'संविधान बचाओ'चा नारा दिला होता. ही घोषणा विशेषत: उत्तर प्रदेशमधील लोकसभा मतदारसंघांमध्ये कामी आली. मात्र महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत या घोषणेचा शून्य परिणाम बघायला मिळाला. खेरीज मराठा आरक्षणावरही काँग्रेस बाजी मारू न शकल्याचे चित्र दिसत आहे. सर्वात महत्त्वाचा आणि लक्षात घेण्याजोगा मुद्दा म्हणजे महाराष्ट्र निवडणुकीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची मोलाची मदत झाली आहे. हरियाणाप्रमाणे येथेही आरएसएसचे लोक भाजपाच्या प्रचारासाठी सक्रिय होते. किंबहुना, लोकसभा निवडणुकीत उत्तर प्रदेशमध्ये भाजपाच्या खराब कामगिरीचे कारण जनसंपर्क कमी पडणे, सर्वसामान्यांपर्यंत कार्यकर्ते न पोहोचणे हे मानले जात होते. मात्र ही चूक सुधारत महाराष्ट्रात संघ कार्यकर्ते प्रचारात उतरले. संघाच्या स्वयंसेवकांनी भाजपाच्या मागे आपली शंभर टक्के ताकद लावली होती. भाजपालाच मत द्या, असा त्यांचा थेट प्रचार नसला तरी अप्रत्यक्षपणे त्यांनी आपल्याच विचाराच्या भाजपाला मोठे बळ देण्यासाठी प्रयत्न केले. त्यामुळेच यंदा गल्लोगल्ली, प्रत्येक वॉर्डामध्ये संघाची ताकद दिसली. त्यामुळेच भाजपाचे पारडे यशाकडे मोठ्या प्रमाणात झुकले.

लोकसभा निवडणुकीमध्ये मुस्लीमांची एकगठ्ठा मते उद्धव ठाकरेंच्या पारड्यात पडली. मात्र आताच्या निवडणुकीत त्याच्या परिणामांची जाण करून देण्यात महायुती यशस्वी ठरली. लोकसभा निवडणुकीनंतर बांगलादेशमध्ये घडलेल्या घटना जनतेने उघड्या डोळ्यांनी पाहिल्या. जणू त्याला प्रतिक्रिया म्हणूनच सिमल्यातील एक अवैध मशिद पाडण्यासाठी तिथला समस्त हिंदू समाज एकवटलेला दिसला. म्हणजेच जातीपातीच्या, प्रांत, भाषेच्या नावाने आपण वेगवेगळे राहिलो तर आपल्यावर अतिक्रमण होईल, हे मत जनतेला पटलेले दिसले. एक राहिलो तर आपल्याकडे कोणी वाकड्या नजरेने पाहू शकणार नाही, कोणी हल्ला करणार नाही हा विचार स्वीकारल्याचेही जनतेने ताज्या निकालाद्वारे सूचित केले आहे. एकीचा हाच मुद्दा महाराष्ट्रात, विशेषत: ग्रामीण भागात वारकरी सांप्रदायानेही उचलून धरला. त्यांनी छोट्या छोट्या गटसभा घेऊन, अगदी ५०-१०० लोकांच्या सभा घेत हा विचार पोहोचवण्याचे मोलाचे काम केले. एखाद्या देवळात, आवारात पार पडलेल्या अशा छोट्या सभांची संख्या ६० ते ७० हजारांच्या घरात होती. त्याचाही परिणाम ताज्या निकालावर प्रभावीपणे दिसून येत आहे.

या सगळ्याबरोबरच जनतेच्या डोळ्यांसमोर महायुतीचे काम होतेच. मध्य प्रदेशातील भाजपा सरकारच्या 'लाडली बहन योजने'नंतर महाराष्ट्रातील महायुती सरकारनेही 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना' सुरू केली आणि वेगाने रेटली. या योजनेअंतर्गत पात्र महिलांना दरमहा १५०० रुपये दिले जात आहेत. भाजपाच्या दणदणीत विजयात या घटकाचाही मोठा वाटा असल्याचे मानले जात आहे. विरोधकांनी या योजनेला मोठा विरोध केला. काही दिवसांमध्येच महिलांना पैसे मिळणे बंद होईल, सरकारची ही महत्त्वाकांक्षी योजना बंद होईल असे म्हणत एकीकडे त्यांनी अपप्रचार केला, तर दुसरीकडे महाविकास आघाडीतील मोठ्या राजकीय पक्षांनी आपल्या प्रचारादरम्यान जाहीर केलेल्या जाहीरनाम्यामध्ये आपले सरकार सत्तेत आल्यास महिलांच्या खात्यात तीन हजार रुपये जमा करण्याच्या घोषणा केल्या. ही बाबही चाणाक्ष नागरिकांच्या नजरेतून सुटली नाही. खेरीज महाविकास आघाडीचा भाग असलेली काँग्रेस, उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस यांनी महागाई, बेरोजगारी या मुद्द्यांवर केलेला राज्य सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्नही तोकडा पडला. त्यांना जनतेचा पाठिंबा मिळेल, अशी आशा होती. पण, परिणाम उलटे झाले. महाराष्ट्रात सोयाबीनच्या हमीभावाचा मुद्दाही उपस्थित झाला नाही. राहून गेलेल्या अशा अनेक मुद्द्यांवर पुढील काळात चर्चा होत राहीलच. सविस्तर अवलोकनही होईल. मात्र तूर्तास तरी महायुती भरभक्कम आघाडी मिळाल्याचा आनंदोत्सव साजरा करत आहे. त्यांना शुभेच्छा देत पुढील पाच वर्षांमध्ये सुशासनाची अपेक्षा व्यक्त करू या.

---

प्रीतीसंगमावर पुतण्याने काकांना केला वाकून नमस्कार

# थोडक्यात वाचलास, अजित पवारांचा रोहित पवारांना टोला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सातारा : यशवंतराव चव्हाणांच्या पुण्यतिथीनिमित्त आज प्रीतीसंगमावर अनेक नेतेमंडळींनी हजेरी लावली. अशातच आज पवारांच्या तीन पिढ्या शरद पवार, अजित पवार आणि रोहित पवार प्रीतीसंगमावर यशवंतराव चव्हाणांना अभिवादन करण्यासाठी उपस्थित होत्या. यावेळी प्रीतीसंगमावर अजित पवार आणि रोहित पवार काही वेळासाठी आमने-सामने आले. त्यावेळी काका अजित पवारांना पुतण्या रोहित पवारांनी वाकून नमस्कार केला. अजित पवारांनी रोहित पवारांच्या पाठीवर कौतुकाची थाप देत, ऑल द बेस्टही म्हटले.



रोहित पवार समोर आल्यानंतर अजित पवारांनी त्यांना हस्तांदोलन केले आणि त्यांना काकांच्या पाया पड, असे म्हणत खाली वाकून नमस्कार करण्यासाठी आग्रह केला. रोहित पवारांनी क्षणाचाही विलंब न लावता, अजित पवारांना खाली वाकून नमस्कार केला. त्यानंतर रोहित पवारांना निवडून आल्याबद्दल अजित पवारांनी अभिनंदन केले आणि दाद्या, थोडक्यात वाचलास, माझी सभा झाली असती तर, काय झालं असतं विचार कर असा टोलाही अजित पवारांनी रोहित पवारांना लगावला.

या भेटीनंतर रोहित पवार म्हणाले की, अजित पवार (क्षळीं झरुरी) माझे काका आहेत, म्हणून मी पाया पडलो. शेवटी संस्कृतीप्रमाणे पाया पडणे माझी जबाबदारी आहे. माझी सभा झाली असती, तर अडचण झाली असती.. असं विधान देखील अजित पवारांनी केलं. यावर रोहित पवारांना विचारले असता नक्कीच अजित पवारांची सभा झाली असती तर वर-खाली झालं असतं, उलटंही होऊ शकलं असतं. पण ते बारामतीमध्ये अडकून पडले होते, त्यांना माझ्या मतदारसंघात येता आलं नाही. शेवटी अजित पवार मोठे नेते आहेत, निर्णय त्यांचा होता. त्यांचे आमदार देखील मोठ्या प्रमाणात निवडून आले आहेत. चांगली गोष्ट आहे, मी त्यांचे अभिनंदन देखील केले, असे रोहित पवार यांनी सांगितले.

---

# मनसे प्रमुख राज ठाकरेंसमोर बैठकीत पदाधिकाऱ्यांनी जाहीर केली नाराजी!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र विधानसभा २०२४च्या निवडणुकीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा एकही उमेदवार जिंकला नाही. विधानसभा निवडणुकीत मनसेने राज्यातील १२५ विधानसभा मतदारसंघांमध्ये उमेदवार उभे केले होते. मात्र, मनसेचा एकही उमेदवार निवडून आला नव्हता. मनसेचे एकमेव आमदार असलेल्या राजू पाटील यांचाही पराभव झाला. तर राज ठाकरे (ठरक्ष ढहरलज्ञशीरू) यांचे पुत्र अमित ठाकरे यांचाही माहीम विधानसभा मतदारसंघात दारुण पराभव झाला. या पराभवाच्या पार्श्वभूमीवर आज (२५ नोव्हेंबर) मुंबईत मनसेची बैठक बोलावण्यात आली होती. या बैठकीत मनसेच्या उमेदवारांनी बैठकीत उघडपणे नाराजी जाहीर केली.



राज ठाकरेंनी बोलावलेल्या बैठकीत बाळा नांदगावकर, नितीन सरदेसाई, अविनाश अभ्यंकर यांच्यासह विविध नेते उपस्थित होते. या बैठकीत पराभूत उमेदवारांकडून ईव्हीएम बाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले. राज ठाकरेंनी उमेदवारांकडून ईव्हीएमबाबत मते जाणून घेतली. यासोबतच भाजपसोबत जाणं ही चूक झाली, अशी स्पष्ट नाराजी उमेदवारांकडून राज ठाकरेंसमोर व्यक्त करण्यात आली. नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत राज ठाकरेंच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला अपयश आलं. मनसेची निवडणुकीत अतिशय सुमार कामगिरी पाहायला मिळाली. पक्षाचा एकही आमदार निवडून आला नाही. शिवाय पक्षाच्या मान्यतेसाठी आवश्यक असणारी पक्षाची मतांची टक्केवारी देखील मिळवता आली नाही. त्यामुळे मनसेची मान्यता रद्द होऊ शकते. याबाबतची माहिती विधीमंडळाचे माजी प्रधान सचिव अनंत कळसे यांनी दिली आहे. एखाद्या पक्षाला मान्यता टिकवायची असेल तर एकूण आठ टक्के मतदान पाहिजे किंवा एक जागा निवडून यायला पाहिजे. दोन जागा आणि सहा टक्के मतदान किंवा तीन जागा आणि तीन टक्के मतदान मिळायला हवं, असा निवडणूक आयोगाचा निकष आहे, असं अनंत कळसे म्हणाले. महाराष्ट्र विधासभा निवडणुकीत मनसेला पराभवाला सामोरे जावे लागले आहे. मागील विधानसभेचं चित्र पाहिलं तर त्यांचा एक आमदार निवडून आला होता. मात्र, यंदाच्या विधानसभा निवडणुकीत त्यांचा एकही आमदार निवडून आलेला नाही. त्यामुळे मनसेची मान्यता रद्द होऊ शकते का? अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरु झाली आहे.

---

# संसदेतील गोंधळींना, आवरणार कसे?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला सोमवारपासून सुरुवात झाली. नवीन संसद भवनात नव्या लोकसभेचे हे पहिलेच हिवाळी अधिवेशन आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधींच्या भगिनी प्रियंका गांधी वड्रा या केरळमधील वायनाड मतदारसंघात झालेल्या पोटनिवडणुकीत खासदार म्हणून निवडून आल्या. गांधी घराण्यातील दोघे भाऊ-बहीण आता लोकसभेत कार्यरत आहेत, साहजिकच काँग्रेसच्या खासदारांमध्ये मोठे उत्साहाचे वातावरण आहे. संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विरोधी पक्षाने लोकसभा व राज्यसभेत मोठा गोंधळ घातला व कामकाज रोखून धरण्याचा प्रयत्न केला. त्याचा परिणाम संसदेच्या दोन्ही सभागृहातील काम अध्यक्ष व सभापतींना तहकूब करण्याचा आदेश द्यावा लागला. देशाच्या क्षितीजावर मोदी पर्वाला सुरुवात झाल्यापासून काँग्रेस पक्षाची घसरण सुरू झाली. सन २०१४ च्या निवडणुकीत तर काँग्रेसचे अक्षरश: पानीपत झाले होते. पक्षाचे अवघे ४४ खासदार निवडून आले. नंतर २०१९ मध्ये त्यात थोडीफार सुधारणा झाली. पण विरोधी पक्षनेता म्हणून मान्यता मिळविण्यासाठी खासदारांची जी किमान संख्या लागते. तेवढेही खासदार काँग्रेसला दोन्ही वेळा निवडून आणता आले नाहीत. पाच महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे शंभर खासदार निवडून आले आणि आता प्रियंका गांधी वड्रा या लोकसभेवर निवडून आल्याने पक्षाच्या खासदारांत उत्साह संचारला आहे.

जनतेचे प्रश्न संसदेत मांडणे, त्याकडे सरकारचे लक्ष वेधून घेणे, जनतेला न्याय मिळवून देणे आणि सरकारच्या बेलगाम कारभारावर लगाम घालणे, हे विरोधी पक्षांचे कर्तव्य असते. लोकसभेच्या सलग तीन निवडणुकांमध्ये काँग्रेसला केंद्राची सत्ता मिळाली नाही. तसेच महाराष्ट्रासारख्या मोठ्या राज्यात नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसची धुळधाण झाली. महाराष्ट्रात महायुतीची सत्ता हटवणार व महाआघाडीचे सरकार स्थापन होणार अशी काँग्रेस हायकमांडने अटकळ बांधली होती. यावर्षी पाच महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत राज्यात महाआघाडीने भाजपापेक्षा मोठे यश मिळवले. राज्यातील ४८ लोकसभा मतदारसंघांपैकी तब्बल ३१ मतदारसंघांत महाआघाडीचे (इंडिया) चे खासदार विजयी झाले. अवघ्या १७ मतदारसंघांत महायुतीचे खासदार निवडून आले होते. लोकसभेत यश मिळाले म्हणून काँग्रेस व उबाठा सेनेने आपल्याला विधानसभा निवडणुकीतही मोठे यश मिळणार असे गृहीत धरले होते. मतदारांच्या मनात नेमके काय आहे याचा त्यांना थांगपत्ता लागाला नाही.

प्रत्यक्षात निकालानंतर महायुतीला पळता भुई कशी थोडी झाली, हेच जनतेला दिसून आले. महाराष्ट्रातील पराभवाच्या नैराश्येतून विरोधी पक्ष संसदेच्या हिवाळी अधिवेशनात गोंधळ घालत असेल, तर जनेतवर अन्याय करणारे ठरेल. संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी मणिपूरमधील हिंसाचार, उत्तर प्रदेशमधील संभल येथे झालेला हिंसाचार व गोळीबार आणि उद्योगपती गौतम अदानींवर अमेरिकेतील न्यायालयाने ठेवलेले आरोप या मुद्द्यांवरून विरोधी पक्षांनी मोठा गोंधळ घातला. त्याचा परिणाम दोन्ही सदनातील कामकाज पिठासीन अधिकाऱ्यांना तहकूब करावे लागले. कामकाज तहकूब झाल्यानंतर विरोधी पक्षाचे सदस्य निघून गेले. मग कामकाज तहकूब करण्याचा त्यांचा हेतू तरी काय होता ? संसदेत खासदार म्हणून निवडून जाणे हे जबाबदारीचे आहे. आपले दायित्त्व देशातील जनतेशी आहे. जनतेच्या अपेक्षा, आकांक्षा आणि भावनांचे प्रतिबिंब देशाच्या सर्वोच्च संसदीय व्यासपीठावर मांडणे, जनतेच्या प्रश्नांवर सरकारचे लक्ष वेधून घेणे व जनतेला न्याय मिळवून देणे हे लोकप्रतिनिधींचे काम आहे. या लोकप्रतिनिधींना गलेलठ्ठ वेतन व भत्तेही दिले जातात. मग गोंधळ घालून कामकाज ठप्प कशासाठी करतात, त्यातून त्यांना काय मिळते? हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सरकारला संविधानात बदल करायचा आहे, असा आरोप करून विरोधी पक्षाने हुल्लडबाजी केली.

लोकसभा निवडणुकीत याच मुद्याचे विरोधी पक्षाने मोठे भांडवल केले होते, 'अब की बार ४०० पार' अशी भाजपाने लोकसभा निवडणुकीत घोषणा दिली होती. संविधानात बदल करण्यासाठी भाजपाला एवढ्या खासदारांची संख्या हवी आहे असे विरोधी पक्षाने प्रचारात म्हटले होते. त्याचा लाभही काँग्रेस व अन्य विरोधी पक्षांना निवडणुकीत झाला.आता हिवाळी अधिवेशनाच्या निमित्ताने विरोधी पक्षाने पुन्हा या मुद्द्याचा शस्त्र म्हणून वापर करायला सुरुवात केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी व



लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी संसदेच्या हिवाळी अधिवेशनात सदनात चांगली व सविस्तर चर्चा घडवावी अशी विरोधी पक्षांकडून अपेक्षा व्यक्त केली आहे. संसदेत गोंधळ घालून व आराडाओरड करून कामकाज बंद पाडण्याचे काम मूठभर सदस्य करीत असतात; पण त्याने लोकांचे प्रश्न सुटत नाहीत. विशेष म्हणजे जे नवीन सदस्य आहेत त्यांना प्रश्न मांडण्याची किंवा भाषण करण्याची संधी मिळत नाही. नवीन सदस्य मोठ्या उत्साहाने व उमेदीने निवडून आलेले असतात. सभागृहातील कामकाजात सहभागी होण्याची त्यांची मनापासून इच्छा असते; पण सदनात वारंवार गदारोळ व गोंधळच होणार असेल व कामकाज बंद पाडले जाणार असेल, तर नवीन सदस्यही नाऊमेद होतील, याचे गोंधळी खासदार भान ठेवत नाहीत. मोदी सरकारने अधिवेशनात कोणत्याही विषयांवर चर्चा घडविण्याची सरकारची तयारी आहे असे म्हटले आहे. मग प्रश्न मांडून लगेचच चर्चा घडवावी, असा विरोधी पक्षांनी हट्ट धरणेही योग्य नाही. मोदी सरकारच्या पहिल्या दोन टर्ममधे लोकसभेला विरोधी पक्षनेता नव्हता, आता राहुल गांधी हे विरोधी पक्षनेते आहेत. त्यांनी सरकारशी संवाद साधून विविध विषयांवर चर्चा घडवली पाहिजे. केवळ आरोप करायचे, गोंधळ घालायचा व कामकाज बंद पाडायचे हे विरोधी पक्षाचे काम नव्हे, पण त्यांना हे समजावून कोण सांगणार ?